



जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in



## -:प्रेस नोट :-

दिनांक :- २९/०५/२०२६

## " नशिराबाद येथे अवैध गोवंश कत्तल प्रकरणी मोठी कारवाई ; 09 आरोपीतां विरुद्ध गुन्हा दाखल करत एकुण12,20,900/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त"

दिनांक २८/०५/२०२६ रोजी सपोनि योगिता नारखेडे या पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, नशिराबाद पोलीस ठाणे हद्दीतील फातेमा नगर भागातील ३६ खोली परिसरात परवीन कुरेशी व मुक्तार कुरेशी यांच्यासह काही इसम हे गोवंश सदृश्य जनावरांची अवैधरित्या कत्तल करून त्याचे मांस विक्री करीत आहेत. तसेच काही गोवंश कत्तलीसाठी आणले आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी तात्काळ मसपोनि नारखेडे यांना आपले अधिपत्याखालील अधिकारी/अंमलदार यांचे पथक तयार करुन वर नमुद ठिकाणी छापा टाकुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेशीत केले.

त्यानुषंगाने नशिराबाद पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी मसपोनि नारखेडे हे आपले अधिपत्याखालील अधिकारी/अंमलदार यांचे पथकासह सदर ठिकाणी अचानक छापा टाकून एकूण ०९ आरोपींना जागीच पकडले व त्यांना गोवंशाची कत्तल करण्यापासून थांबविले तसेच त्यांच्या **ताब्यातून ०३ गायी, ०१ बैल, ०९ गोऱ्हे, ०२ लहान वासरे तसेच सुमारे २०० किलो गोवंश सदृश्य जनावरांचे मांस आणि सदर गोवंश जनावरे व त्यांचे मांस वाहतूक व विक्रीसाठी वापरण्यात आलेली वाहने असा एकूण १२,२०,९००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

**सदर प्रकरणी एकूण ०९ आरोपींविरुद्ध नशिराबाद पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १७२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २७५ सह महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम कलम ५, ५(क), ९, ९(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास श्रेणी पो.उपनिरीक्षक हरेष पाटील हे करीत आहेत.**

**सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी भुसावळ विभाग केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती योगिता नारखेडे यांचे नेतृत्वात पो.उपनिरी/रविंद्र तायडे, पो उप निरी/हरेष पाटील, सफौ/शरद सोनार, सफौ/ राजेश मेंढे, पोहेकॉ/१९ चंद्रकांत पाटी, पोहेकॉ/२९१५ गुणवंत देखमुख, पोहेकॉ/प्रशांत विरणारे, पोहेकॉ/२७१४ कमलाकर बागुल, पोकॉ/३४६ भरत बाविस्कर, पोकॉ/४७६ पंकज सोनवणे, पोकॉ/८०० विठ्ठल मुंढे, पोकॉ/२१२१ सागर बिडे, पोकॉ/२११ विजय अहिरे, पोकॉ/२६८ भुषण पाटील, पोकॉ/३३८३ रामकृष्ण माळी या पथकाने उत्कृष्ट अशी उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**